महाराष्ट्र शासन

कला संचालनालय

सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई-४०० ००१,दू.क्र.२२६२०२३१/३२ ई-मेल directorateofart@gmail.co

दिनांक:- 1 JAN 2021

क्रमांक:-डिओऐ/२०२०/दोन/06

प्रति,

अधिष्ठाता व प्राचार्य,

शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित

व विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित कला संस्था,(महाराष्ट्र राज्य)

विषय :- कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील अभ्यासक्रमांचे अध्यापन ( प्रथम वर्ष ) ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्याबाबत...

संदर्भ :- निरीक्षक चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.निचिशि-२०२०/२१५, दि. १०.०८.२०२०

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदविका/प्रमाणपत्र कला विषयक अभ्यासक्रम १) मुलभूत अभ्यासक्रम २) ए.टी.डी. ३) आर्टमास्टर प्रमाणपत्र ४) रेखा व रंगकला, ५) उपयोजित कला , ६) शिल्पकला व प्रतिमानबंध, ७) अंतर्गत गृहसजवाट, ८). वस्त्रकाम (टेक्सटाईल्स),९) मातकाम (सिरॅमिक व पॉटरी ), १०) कला शिक्षणशास्त्र पदविका ) या १० अभ्यासक्रमांची प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया दिनांक ३०.१२.२०२० पर्यंत पूर्ण होत आहे.

त्यानुसार कोविड १९ चा प्रादुर्भावामुळे उद्भवलेली गंभीर परिस्थिती लक्षात घेता तसेच संदर्भिय क्र.१ चे पत्राच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

कला संचालनालयाच्या अखत्यारीतील पदविका अभ्यासक्रमाचे दैनंदिन अध्यापन तसेच तद्नुषंगिक कामकाज, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित तसेच कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता, ऑनलाईन पध्दतीने पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने १) मुलभूत अभ्यासक्रम २) ए.टी.डी. ३) आर्टमास्टर प्रमाणपत्र ४) रेखा व रंगकला, ५) उपयोजित कला , ६) शिल्पकला व प्रतिमानबंध, ७) अंतर्गत गृहसजवाट, ८). वस्त्रकाम (टेक्सटाईल्स),९) मातकाम (सिरॅमिक व पॉटरी ), १०) कला शिक्षणशास्त्र पदविका ) या १० अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्षाचे अध्यापन दिनांक ४ जानेवारी २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्याबाबत संबंधित प्राचार्य यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

ऑनलाईन पध्दतीने होणा-या अध्यपनांबाबतची ऑनलाईन विद्यार्थ्याच्या उपस्थितीची नोंद,विद्यार्थ्यांनी पूर्ण केलेल्या स्वाध्यायाच्या नोंदी, इमेजेस तसेच अध्यापनाचे व तद्अनुषंगिक बार्बीची परिपूर्ण संगणकीकृत माहिती प्राचार्यांनी संग्रही ठेवणे आवश्यक आहे. वेळोवेळी तपासणीसाठी येणा-या तज्ञांना सदर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

विद्यार्थ्यांच्या समस्यांचे समाधान व वेळोवेळी मार्गदर्शन करता यावे याकरिता व्हॉटसअप किंवा अन्य साधनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संपर्कात राहावे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे वार्षिक कामकाजाचे दिवस पूर्ण करण्याच्या अनुषंगाने आवश्यकता असल्यास सुट्टीच्या दिवशी अध्यपनाचे दैनंदिन कामकाज करण्यात यावे. उक्त प्रक्रिया राबविताना आरोग्यविभागाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन सदर प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी संबंधित अधिष्ठाता / प्राचार्य यांची राहील.

( राजीव मिश्रा)

कला संचालक

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत,

१)निरीक्षक, चित्रकला व शिल्प,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२)सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय,नागपूर/औरंगाबाद यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

त्यांना कळविण्यात येत की, उक्त शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ऑनलाईन अध्यापनाचे कामकाज महाविद्यालयांमार्फत योग्य प्रकारे होत असल्याबाबत योग्य ते नियंत्रण त्यांच्यामार्फत करण्यात यावे. त्याबाबतचा अहवाल संचालनालयास वेळोवेळी सादर करण्यात यावा.

३)कार्यासन क्रमांक- तीन/चार/पांच यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) निवड फाईल.